

# कमला कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

विद्यार्थी वाचनापासून दूर जात आहेत. वाचनाची गोडी कमी झाली आहे. त्यामुळे वाचनसंस्कृतीच्या संवर्धनाची गरज आहे, असे मत कॉलेजचे प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी व्यक्त केले. कमला कॉलेजमध्ये आयोजित दोन दिवसीय ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य पाटील यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धा परीक्षेतील बदल, मानसशास्त्र, समाजशास्त्र, गृहशास्त्र, अर्थशास्त्र, स्पर्धा परीक्षा अशा विविध विषयांवरील एक हजार पुस्तके प्रदर्शनात ठेवण्यात आली आहेत. ग्रंथप्रदर्शनासाठी ग्रंथपाल उर्मिला कदम व प्रा. ए. एम साळोखे यांचे सहकार्य लाभले. ग्रंथप्रदर्शन शुक्रवारपर्यंत खुले राहणार आहे.